आंतरराष्ट्रीय परिषदेस उपस्थित
राहण्यासाठी शासनाकडून
अर्थसहाय्य मिळणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
उच्च व तंत्रशिक्षण विभाग
शासन निर्णय क्र.संकीर्ण-२००९/(१७/०९)विशि-१
मंत्रालय, मुंबई ४०००३२
दिनांक : ३१ ऑगस्ट, २००९

वाचावे : १) शिक्षण व स्वयंरोजगार विभाग शासन निर्णय
क्र.युएसजी-१०७९/(४७३३)/युएनआय-१, दि.३१.१०.८०

**शासन निर्णय :** शासनाच्या संदर्भिय दि.३१.१०.८० च्या निर्णयातील तरतुद व त्या सोबतच्या नियमावली प्रमाणे परदेशातील आंतरराष्ट्रीय परिषद, सेमीनार इत्यादीसाठी उपस्थित राहण्यासाठी पात्र शिक्षकांना प्रत्येकी रु.१०,०००/- इतके अर्थसहाय्य राज्य शासनामार्फत देण्यांत येते.

२. शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की संबंधीताकडून अर्थसहाय्यसाठी उशिरा प्राप्त होणारे अर्ज, महाविद्यालय, विद्यापीठांकडून संचालक, उच्च शिक्षण यांना प्रस्ताव पाठविण्यास होणारा विलंब व त्यानंतर संचालक, उच्च शिक्षण यांचे स्तरावर प्रस्ताव तयार करुन तो शासनास पाठविण्यास होणारा विलंब इत्यादि विविध कारणामुळे संबंधितास अर्थसहाय्य मिळण्यास विलंब होतो. हा विलंब टाळण्यासाठी व पात्र शिक्षकांना, अर्थसहाय्य वेळेवर मिळावे म्हणून संबंधित पात्र शिक्षकांना रु.१००००/- इतके अर्थसहाय्य मंजुर करण्याचे सर्व अधिकार संचालक, उच्च शिक्षण यांना या शासन निर्णयान्वये प्रदान करण्यात येत आहेत. संचालक उच्च शिक्षण यांनी प्रलंबित असणा-या सर्व प्रस्तावांचा आढावा घ्यावा व अर्थसहाय्याबाबत त्यांच्या स्तरावर योग्य तो निर्णय घ्यावा.

३. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र.२००९०९०२१२२४५१००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

(रा.स.अटक)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
१. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
२. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे
सर्व विशि व मशि कार्यासने , उच्च व तंत्रशिक्षण विभाग
निवडनस्ती / विशि-१